अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०७ चा सरतपास
मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नांव :- दिव्या देवेंद्र ठाकुर, वय :- ३६ वर्षे,

नेमणुक :- म.पो.कॉ. - ब.क्र.५४, राहणार :- सावंतवाडी.

सावंतवाडी पोलीस ठाणे.

**<u>सरतपास सरकारतर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. व्ही. पेडणेकर यांचेकडून सुरु</u>** -

दि.२७.०४.२०२५ रोजी मी पोलीस ठाणेत हजर असताना पो.नि. खोपडे साहेबांनी असे सांगितले की, त्यांना गोपनीय माहिती मिळाली आहे की, अस्लम खेडेकर यांच्या घरात अवैध जुगाराचा व्यवसाय चालू आहे व तिकडे जाण्यासाठी आम्हाला रवाना व्हायचे आहे. त्या अनुषंगाने मा. उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांच्याकडुन घरझडती वॉरंट प्राप्त झाले होते. त्याप्रमाणे आम्ही पो.नि. खोपडे, पो. उप नि. भगत, पो.हे.कॉ. मळगांवकर, पो.ना. साटेलकर व गोपनीय पोलीस अंमलदार सुतार असे साटेली भेडशी, थोरलेभरड येथे रवाना झालो. रवाना झाल्यानंतर त्याठिकाणी पेट्रोलींग करणारे पो.हवा. देसाई यांना बोलावून घेतले. पो.नि. खोपडे यांनी त्यांना दोन पंच बोलावून घेण्यासाठी सांगितले असता देसाई यांनी दोन पंच बोलावून घेतले. त्यानंतर एक व्हीडीओग्राफर प्रमोद नारायण गवस यांना देखील बोलावून घेतले. त्यानंतर आम्ही सर्व साटेली भेडशी येथे घर क्र. ९५३ येथे गेलो. त्याचे मालक अस्लम इस्माईल खेडेकर होते. त्यांना बोलावून घेतल्यावर त्यांनी सांगितले की, त्या घरामध्ये मोहमदीया सामाजीक

संस्थेचे काम चालते. त्याठिकाणी बिलाल आलम शेख नावाचे दुसरे इसम होते. त्यांनी सांगितले की, ते मुस्लीम भाषा अरबी व उर्दु भाषा शिकवतात.

२) त्यानंतर त्यांची घरझडती घेण्याची परवानगी घेतली. त्या घराची घरझडती घेत असताना त्या घराच्या स्वयंपाकघरामध्ये एका तंगुसच्या पिशवीत दोन तलवारी मिळुन आल्या. ती पिशवी लालसर रंगाची होती व त्यावर ५५५ जीराराईस असे लिहीलेले होते. त्यातील एका तलवारीला लाल रंगाची मुठ होती. तिच्या मुठीची लांबी ५.५ इंच व त्या तलवारीची लांबी २२ इंच व रुंदी १.५ इंच होती. दुसरी तलवार निळया रंगाची मुठ असलेली होती. तिच्या मुठीची लांबी ५.५ इंच होती व तलवारीची लांबी २०.५ इंच व रुंदी १.५ इंच होती. त्या प्रमाणे दोन पंचासमक्ष दोन्ही तलवारी व पिशवी जप्त करण्यात आल्या. त्या अनुषंगाने पो.हवा. देसाई यांनी त्या संस्थेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व एकुण ८ आरोपीं विरुद्ध दि.२८.०४.२०२५ रोजी तक्रार देऊन गुन्हा दाखल करण्यात आला. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकते. ते आज रोजी न्यायालयात हजर आहेत. मी मुद्देमाल पाहिल्यास ओळखु शकते. आता मला MO–1 वरील लाल रंगाची पिशवी दाखविण्यात आली. ती तीच आहे. आता मला MO–2 वरील लाल रंगाची मुठ असलेली तलवार दाखविण्यात आली. ती तीच आहे. आता मला MO–3 वरील निळया रंगाची मुठ असलेली तलवार दाखविण्यात आली. ती तीच आहे.

**सरतपास पूर्ण.**

**नि.क्र.७० अर्जावरील आदेशान्वये साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-

ठिकाणः- दोडामार्ग. (आर. आर. भगत)
दिनांकः- १७/०६/२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग-१, दोडामार्ग.